वन स्टेट, वन डेस्टिनेशन : प्रशासन-स्थानिक नागरिक समन्वयातून कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश

सिंधुदुर्ग पर्यटनाला नवी दिशा

जिल्ह्याच्या पर्यटनाला अधिक चालना देण्यासाठी 'वन स्टेट वन डेस्टिनेशन' हा उपक्रम राबविला जाणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्याची पर्यटन ओळख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्या समन्वयातून या उपक्रमाचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी सर्व विभागांना दिले आहेत.

सिंधुदुर्गनगरी : 'वन स्टेट, वन डेस्टिनेशन' उपक्रमाच्या अंमलबजावणी नियोजन बैठकीत बोलताना जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे. बाजूला पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, उपजिल्हाधिकारी प्रतिभा वराळे.

त. भा. प्रतिनिधी

ओरोस : शासनाच्या 'वन स्टेट, वन डेस्टिनेशन' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात प्राथमिक नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत सिंधुदुर्ग जिल्ह्याची पर्यटन क्षमता अधिक व्यापक पातळीवर विकसित करण्यासाठी विविध बाबींवर चर्चा करण्यात आली.

सिंधुदुर्ग हा नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, समुद्रकिनारे, किल्ले, ग्रामीण पर्यटन आणि स्थानिक संस्कृती यांचा समृद्ध संगम असलेला जिल्हा आहे. त्यातच या उपक्रमामुळे आपल्या जिल्ह्यातील पर्यटन वाढणार असल्याचेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

पर्यटनस्थळांची निवड, आवश्यक पायाभूत सुविधा, पर्यटकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, पर्यटन माहिती केंद्रे, डिजिटल प्रचार, स्थानिक कला, खाद्यसंस्कृती आणि लोकसहभाग या विषयांवर प्राथमिक स्तरावर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील पर्यटन विकासासाठी विविध विभागांकडून आवश्यक माहिती संकलित करून कृती आराखडा तयार करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

मंगेश जोशी यांनी या उपक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली. प्रारंभिक नियोजनानंतर संबंधित विभागांकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त करून पुढील टप्प्यात व्यापक कृती आराखडा निश्चित करण्यात येणार असल्याचे सांगितले. 'वन स्टेट, वन डेस्टिनेशन" उपक्रमामुळे सिंधुदुर्गची पर्यटन ओळख अधिक बळकट होऊन स्थानिक रोजगार, उद्योजकता आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी अमित कामत यांनी या उपक्रमाविषयी सविस्तर सादरीकरण करून आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांविषयी माहिती दिली.

या प्राथमिक बैठकीत सिंधुदुर्गच्या पर्यटन विकासाला अधिक चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण संकल्पना, पर्यटन सर्किटची निर्मिती, स्थानिक पर्यटनस्थळांचे ब्रँडिंग आणि पर्यटकांचा दर्जेदार अनुभव वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला. तसेच जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्राशी संबंधित विविध संस्था आणि संघटनेच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाबाबत मत मांडली.

यावेळी पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, उपजिल्हाधिकारी प्रतिभा वराळे, आरती देसाई, कोकण विभागाच्या उपसंचालक डॉ. प्रभा मनोहर, कार्यकारी अभियंता आकाश चकोर, जिल्हा नियोजन अधिकारी यशवंत बुधावले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

'एसटीएस' परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा आज कणकवलीत सन्मान

पालकमंत्री नीतेश राणे यांच्या हस्ते होणार गौरव : अडीच लाखाची बक्षिसे

त. भा. प्रतिनिधी

नीतेश राणे

संदेश सावंत

संजना सावंत

कणकवली : युवा संदेश प्रतिष्ठानच्यावतीने घेण्यात आलेल्या सिंधुरत्न टॅलेंट सर्च (एसटीएस) परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व प्रतिष्ठानच्या आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार सोहळा १९ जुलै रोजी सकाळी १०.३० वा. येथील भगवती मंगल कार्यालयात होणार आहे. हा बक्षीस वितरण सोहळा राज्याचे मत्स्योद्योग व बंदरे विकासमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नीतेश राणे यांच्या हस्ते व जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते शाळेचे पंढरीनाथ धोंडी सावंत यांना युवा संदेश प्रतिष्ठान आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षणप्रेमींनी उपस्थित राहवे, असे आवाहन युवा संदेश प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष, जि. प. माजी अध्यक्ष, जि. प. सदस्य संदेश उर्फ गोट्या सावंत आणि प्रतिष्ठानच्या अध्यक्षा, जि. प. माजी अध्यक्षा संजना संदेश सावंत, एसटीएस परीक्षा प्रमुख सुशांत मर्गज यांनी केले आहे.

वैश्य समाज विद्यार्थी गुणगौरव आज

सावंतवाडी : वैश्य समाज सावंतवाडी व हिंदू वैश्यवाणी युवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, १९ जुलै रोजी सायंकाळी पाच ते सात या वेळेत सावंतवाडी कळसुलकर हायस्कूलच्या सभागृहात गुणगौरव आयोजित करण्यात आला आहे. या गुणगौरव सोहळ्याला सावंतवाडी मतदारसंघाचे आमदार दीपक केसरकर, आमदार प्रमोद जठार उपस्थित राहणार आहेत. वैश्य वाणी समाजातील गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनींचा गौरव दरवर्षी केला जातो. यावर्षीही गौरव केला जाणार आहे. सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वैश्य समाज सावंतवाडीचे रमेश भाट, हिंदू वैश्यवाणी युवा संघटनेचे अध्यक्ष अमित गंवडळकर, महिला संघटना अध्यक्ष तनुजा पोकळे आदींनी केले आहे.

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी प्रस्ताव करावेत!

सिंधुदुर्गनगरी : भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनेंतर्गत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसहाय्याच्या विविध योजना ग्रंथालय संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येतात. सन २०२६-२७ साठी विविध समान व असमान निधी योजनांचा लाभ घेण्यासाठी राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्या संदर्भातील नियम, अटी व नमुना प्रतिष्ठानच्या www.rrrlf.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक ग्रंथालयांनी अर्जाचा नमुना संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावा. सन २०२६-२७ साठीच्या समान निधी योजना याप्रमाणे आहेत. (Matching Schemes) इमारत बांधकाम व विस्तार अर्थसहाय्य योजना कमाल २५ लाख रुपये. या योजने व्यतिरिक्त समान निधी योजनेंतर्गत इतर योजनांचा लाभ केंद्रीय पध्दतीने देण्यात येत असल्यामुळे इतर योजनेसाठीचे प्रस्ताव सादर करू नयेत.

दोडामार्ग : शिवसेना कार्यालयात केक कापून वाढदिवस साजरा करताना शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते.

दोडामार्गात केसरकरांचा वाढदिवस साजरा

त. भा. वार्ताहर

दोडामार्ग : माजी मंत्री तथा विद्यमान आमदार दीपक केसरकर यांच्या वाढदिवसानिमित्त दोडामार्ग तालुक्यात शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला.

यावेळी सर्वप्रथम दोडामार्ग येथील शिवसेना कार्यालयात आमदार दीपक केसरकर यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला. उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमेकांना केक भरवत आमदार केसरकर यांना दीर्घायुष्य, निरोगी आयुष्य आणि पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. रुग्णांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांना लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या उपक्रमामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी समाधान व्यक्त करत शिवसेना पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख तथा पंचायत समिती उपसभापती गणेशप्रसाद गवस, उपजिल्हाप्रमुख राजेंद्र निंबाळकर, उपतालुकाप्रमुख दादा देसाई, तिलकांचन गवस, तालुका संघटक गोपाळ गवस, युवासेना तालुकाप्रमुख भगवान गवस, पंचायत समिती सदस्य सायली निंबाळकर, सरपंच सेवा संघाचे तालुकाध्यक्ष अनिल शेटकर, दादा पालेकर, संदीप गवस, सूर्यकांत गवस, अमरसिंग राणे, संतोष घोगळे, विनायक शेट्टी, मनीषा गवस, नंदू टोपले, दत्तराम देसाई, सुनील गवस, विजय गवस, हर्षा टोपले, महादेव नाईक, गुरुदास सावंत, रेखा लोंढे, सविता परमेकर-नाईक यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युवा रक्तदाता संघटनेच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद

माजी मंत्री, आमदार दीपक केसरकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजन

त. भा. प्रतिनिधी

सावंतवाडी : रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना संजू परब. बाजूला डॉ. संदीप सावंत, बाबू कुडतरकर, ॲड. नीता सावंत-कविटकर, अशोक दळवी, देव्या सूर्याजी, शर्वरी धारगळकर, स्नेहा नाईक, ॲड. सायली दुभाषी, शीतल नाईक, परीक्षित मांजरेकर. दीपक गावकर

सावंतवाडी : माजी मंत्री तथा आमदार दीपक केसरकर यांच्या वाढदिवसानिमित्त युवा रक्तदाता संघटना व नगरसेवक देव्या सूर्याजी मित्रमंडळातर्फे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख संजू परब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. संदीप सावंत, नगरसेवक बाबू कुडतरकर, महिला जिल्हाप्रमुख ॲड. नीता सावंत-कविटकर, अशोक दळवी, नगरसेवक देव्या सूर्याजी, शर्वरी धारगळकर, स्नेहा नाईक, ॲड. सायली दुभाषी, पं. स. सदस्या प्रणाली टिळवे, शीतल नाईक, गजानन नाटेकर, परीक्षित मांजरेकर उपस्थित होते.

यावेळी रक्तपेढीचे मुख्य अधिकारी प्रशांत सातार्डेकर, तंत्रज्ञ प्राजक्ता रेडकर, परिचारिका मानसी बागेवाडी, अनिल खाडे, गोविंद श्रीरामे, रविना लोहंबरे, प्राची राणे यांचा रक्तपेढीच्या अविरत सेवेबद्दल शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सुप्रिता धारणकर, भारती परब, पूजा नाईक, शगुप्ता पडवेकर, शीतल नाईक, नीलम कुमठेकर, राजश्री निर्गुण, विश्वास घाग, गजानन नाटेकर, बासीत पडवेकर, युवा रक्तदाता संघटनेचे संदीप निवळे, वसंत सावंत, ॲड. प्रसाद नाटेकर, पंकज बिद्रे, क्रिश सावंत, भास्कर आमुणेकर, भगवत पोळ, मेहर पडते उपस्थित होते.

महाराष्ट्र ग्रामीण बँक
MAHARASHTRA GRAMIN BANK
शासकीय मालकीची शेड्युल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

ई-लिलाव व विक्री सूचना

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३,(भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर -IV, सिडको, छ. संभाजीनगर .-४३११३६.
क्षेत्रीय कार्यालय : रत्नागिरी

सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा - २००२ तहत ई-ऑक्शन द्वारे (ऑनलाईन विक्री) विक्रीची जाहीर सूचना तथा, कर्जदार / जामीनदारास सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधन्यात येईल) सह वाचण्यात येणारा सरफेसी कायदा २००२ (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) तहत ई-ऑक्शन द्वारे विक्री

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा सेक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार / तारणकर्ता यांचे संरक्षित मालमत्तेच्या घेतलेल्या ताब्याला अनुसरून व सर्व जनतेस व संबधीत कर्जदार / तारणकर्ता व जर त्यांचे कायदेशीर वारसदार असतील तर त्यांचेसह सर्व संबधीतास कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता **'जशी आहे जेथे आहे तशी'** व **'जी काय आहे तशी'** या तत्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संरक्षित ऋणको आहेत, त्यामुळे कर्जदाराचे /भागीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावाद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही कोर्टाची स्थगिती (Stay) नाही.

मिळकत लॉट क्र.	कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्ज खाते क्र.	मालमत्तेचा तपशील (चतु:सीमेसहीत)	विक्री केली जात असलेल्या मालमत्तेची थकीत रक्कम	आरक्षित किंमत रुपये इसार जमा राशी रुपये बोली रक्कमेतील किमान वाढ रुपये	प्रत्यक्ष ताबा दिनांक
१	**कर्जदार- एम/एस. जयलक्ष्मी एंटरप्रायझेस १) श्री. उमेश सुरेश शिंदे (मालक)** पत्ता: फ्लॅट क्र. २०२, दुसऱ्या मजल्यावर, रवींद्रोदय प्लाझा, कान्हे हॉलजवळ, कळंबस्ते, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, पिन कोड : ४१५६०५. **२) श्री. अभिषेक प्रमोद दाभोलकर (जामीनदार)** पत्ता: फ्लॅट क्र. १०४, चंद्रसुमन सोसायटी, कान्हे हॉलजवळ, कळंबस्ते, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी, पिन कोड :- ४१५६०५ **कर्ज खाते क्रमांक ६७१२६०००१९३/ ६७१२६००३३०९/६७१२६००१४८२**	श्री उमेश सुरेश शिंदे यांच्या फ्लॅट क्र. २०२, बांधकाम क्षेत्रफळ ७५५ चौ. फूट, दुसऱ्या मजल्यावरील 'रविंद्रोदय प्लाझा' मध्ये, गट क्र. १४९/१ मध्ये, क्षेत्रफळ ००-०८-५० (एच-आर), कळंबस्ते, तालुका चिपळूण, जिल्हा रत्नागिरी ४१५६०५ येथे स्थित. मोजमाप : बांधकाम क्षेत्रफळ ७५५ चौ. फूट चतु: सीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्व: मार्ग पश्चिम: मोकळी जागा उत्तर: मोकळी जागा दक्षिण: फ्लॅट क्र. २०१	एकूण थकबाकी . रु.२१,१६,८४४.१९ + दि. ३०-०६-२०२३ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०७/२०२३ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. १९,४०,०००/-** **रु. १,९४,०००/-** **रु. १०,०००/-**	११.०७.२०२५
२	**कर्जदार - मेसर्स समृद्धी प्रिंटर्स १) श्री. जितेंद्र चंद्रकांत परब (मालक)** पत्ता:मु/पो.सारंबळ-किर्तनवाडी,ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिन कोड: ४१६५२० **२)सौ.सुस्मिता जितेंद्र परब(सह-कर्जदार)** पत्ता: मु/पो.सारंबळ-किर्तनवाडी,ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग,पिनकोड: ४१६५२० .**३) श्री. हिरामणी रामचंद्र परब (जामीनदार)** पत्ता: मु/पो. वायंगवडे, चारिवाडी,ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग, पिन कोड:४१६६०३ **४) श्री. किशोर हिरामणी परब (जामीनदार)** पत्ता:मु/पो.वायंगवडे, चारिवाडी,ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, पिन कोड: ४१६६०३ **५) श्री.शायर कासम खान (जामीनदार)** पत्ता: मु/पो. सारंबळ, दुर्गावाडी, सरसोली धाम जवळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग,पिन कोड: ४१६५२० **कर्ज खाते क्रमांक ६७२०१०००३४६ / ६७२०१००५५७२/६७२०१००५८४४**	श्री. जितेंद्र चंद्रकांत परब व सौ. सुस्मिता जितेंद्र परब यांच्या नावाने असलेला दुकान गाळ्याचा समतुल्य तारण बाजारपेठ, कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील गणेश कॉम्प्लेक्स मधील दुकान गाळा क्र.८, ग्रामपंचायत घर क्रमांक ६०२(८), क्षेत्रफळ ५१.६० चौ.फु.असलेली जागा तसेच त्यावर उभारलेली इमारत, शेड्स व इतर बांधकामासह सर्व मिळून असलेली मालमत्ता. मोजमाप : बांधकाम क्षेत्रफळ ५१.६० चौ. फूट चतु: सीमा खालीलप्रमाणे आहे पूर्व: इमारतीचा मार्ग पश्चिम: मोकळी जागा उत्तर: जिना दक्षिण: दुकान गाळा क्र. ०७	एकूण थकबाकी. रु.२४,७५,७८२/- + दि. ३१-०३-२०१४ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०४/२०१४ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. ४,१८,०००/-** **रु. ४१,८००/-** **रु. १०,०००/-**	१७.०३.२०२१
३	**१) श्रीमती स्नेहा संजय घोसळकर (कर्जदार)** पत्ता: फ्लॅट क्र. T-५, आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बी. एन. सावंत रोड, मु.पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२ **२) श्री.सुमित संजय घोसळकर (सह-कर्जदार)** पत्ता: फ्लॅट क्र. T-५, आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बी. एन. सावंत रोड, मु. पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२० **३) श्रीमती विजया सुधाकर सावंत** पत्ता: ५२, चौसोपी साड्यांमिरया, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६१२ **४) श्री. नर्जुल इस्लाम हेकमत अली** पत्ता: १०८०, पाडवेकर कॉलनी, उद्यम नगर, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६३९ **कर्ज खाते क्र.: ६७१०१००९६५९**	समभागीय गहाण : रत्नागिरी नगर परिषद हद्दीतील, मु. पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२ येथील राहतघर मधील इमारत 'आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी', बी.एन. सावंत रोड येथील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. T-०५, ज्याचे क्षेत्रफळ १६० चौ. फूट (सर्व्हे क्र. ६१-१-१, हिस्सा क्र. ८, क्षेत्र ०.१९) आणि क्षेत्रफळ ७३० चौ. फूट (सर्व्हे क्र. ६१-१-१, हिस्सा क्र. ९, क्षेत्र ०.९१) आहे. चतु:सीमा: पूर्व: फ्लॅट क्र. T-०६,पश्चिम: फ्लॅट क्र.T-०४, उत्तर: मोकळी जागा, दक्षिण: रस्ता/पॅसेज	रु. १४,०९,८८६.४२ + ३१/०५/२०२५ पर्यंतचे वसूल न झालेले व्याज + बिगर-लागू व्याज दिनांक ३०/०४/२०२५ पासून + इतर खर्च व आकार.	**रु. २२,२०,०००/-** **रु. २,२२०००/-** **रु. १०,०००/-**	१३.०२.२०२६
४	**कर्जदार: १) श्री. भगवान लक्ष्मण सुतार** पत्ता: ३०७८ ए, झाडगाव नाका, भैरीवाहन जवळ, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी ४१५६१२ **जामीनदार: १) सौ संगीता भगवान सुतार** पत्ता: ३०७८ ए, झाडगाव नाका, भैरीवाहन जवळ, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी ४१५६१२ **२) श्री. सतीश सदाशिव कुलकर्णी** पत्ता: ब्लॉक नंबर १, साईराज अपार्टमेंट पार्क ओपल, अभ्युदय नगर, नाचणे रोड, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६१२. **कर्ज खाते क्र. ६७१०१०००५६६, ६७१०१०१०२४६**	समतुल्य गहाणखत मौजे नाचणे, तालुका व जिल्हा रत्नागिरी ४१५६१२ येथील सर्व्हे क्रमांक ४४१/अ, हिस्सा क्रमांक ७/१२, ग्रामपंचायत घर क्रमांक १५९०-फ मधील एकूण क्षेत्रफळ ०.०६.८० हे.आर. आणि ४०० चौरस फूट बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेले, 'साईदीप गृहसंकुल' नावाच्या इमारतीमधील 'ए' विंगच्या पहिल्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्रमांक ए-१०१ चे सर्व तुकडे आणि भूखंड. गहाण मालमत्तेच्या चतु:सीमा: पूर्व: रस्ता,पश्चिम: हिस्सा क्रमांक ५ उत्तर: भूखंड क्रमांक १, दक्षिण: श्री. रसाळ यांची मालमत्ता	एकूण थकबाकी. रु. ८,७८,५५०.०४ + दि.२९-०१-२०२६ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०१/२०२६ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. ७,९२०००/-** **रु. ७९२००/-** **रु. १०,०००/-**	२०.०६.२०२६
५	**१) श्री. जयेश अनंत खानविलकर - कर्जदार: २) श्रीमती कोमल जयेश खानविलकर- सहकर्जदार:** फ्लॅट नंबर १०२, घर क्रमांक १३४०बी, ओमसाईराम लक्ष्मी कृपा, शांतीनगर, मु. पो. नाचणे, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६३९. **जामीनदार: १) श्री. दिलीप दयाराम देसाई** पत्ता: बी२, वेदांग पॅराडाईज, थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२. **कर्ज खाते क्रमांक: ६७१०१००४०८३ ६७१०१०००६०१,६७१०१००६७५०**	समतुल्य गहाणखत मौजे शांती नगर, नाचणे, तालुका व जिल्हा रत्नागिरी ४१५६३९ येथील सर्व्हे क्रमांक ४४३, हिस्सा क्रमांक (१/२अ+१/२ब+१/२इ)२/७ वरील जमिनीवर बांधलेल्या ओम साईराम लक्ष्मी कृपा अपार्टमेंट नावाच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील ११७२ चौरस फूट क्षेत्रफळ असलेला निवासी फ्लॅट क्रमांक १०२, म्हणजेच ग्रामपंचायत घर क्रमांक १३४०बी चे सर्व तुकडे आणि भूखंड. सदर क्षेत्राच्या चतु:सीमा : पूर्व: खुली जागा आणि रस्ता, पश्चिम: फ्लॅट क्रमांक १०१, उत्तर: बाजार समितीची मालमत्ता दक्षिण: श्री. केतकर यांची मालमत्ता	एकूण थकबाकी. रु. १७,९७,७१३.३४ + दि.२७-०६-२०२५ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०६/२०२५ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. २५,३२,०००/-** **रु. २,५३,२००/-** **रु. १०,०००/-**	२०.०६.२०२६
६	**कर्जदार: १)श्रीम. दिक्षा हनुमंत लाड** पत्ता:मु. पो. गोठणे ता. मालवण जि. सिंधुदुर्ग **जामीनदार: २) श्री. शैलेश रामचंद्र चव्हाण** पत्ता- श्री समर्थ लिला इमारत, दुसरा मजला, सदनिका क्र.एस-१७, मु.पो. आशिये, ता.कणकवली जि. सिंधुदुर्ग. **कर्ज खाते क्रमांक: ६७२०३०००८०९ / ६७२०३००४६४४**	समतुल्य गहाणखत जामीनदार श्री. शैलेश रामचंद्र चव्हाण यांच्या मालकीची मालमत्ता. निवासी फ्लॅट क्रमांक एस-१७, दुसरा मजला, ज्याचे नाव श्री. समर्थ लीला आहे, जी.पी. मिलकत क्रमांक ३४९, बांधलेले क्षेत्रफळ ६४५.५५ चौ.फूट, जे आशिये, ता. कणकवली येथील गट क्रमांक २९०/९२ (एकूण क्षेत्रफळ ०-०३-३८ एच.आर) आणि गट क्रमांक २१०/१३ (एकूण क्षेत्रफळ ०-०४-०२ एच.आर) असलेल्या जमिनीवर उभे आहे. चतु:सीमा: पूर्व:- मोकळी जागा पश्चिम: निवासी सदनिका क्र. एस-०१६ उत्तर: मोकळी जागा दक्षिण: जिना	एकूण थकबाकी. रु. ८,८९,१४५.४६ + दि. ०२-०५-२०२५ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०४/२०२५ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. १८,८०,०००/-** **रु. १,५८,०००/-** **रु. १०,०००/-**	०८.१०.२०२५
७	**१) श्री. अनिल पांडुरंग कदम - कर्जदार २)सौ.अनुजा अनिल कदम-सहकर्जदार बावडेकर बंगला,** मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, पिन - ४१६ ११२. **३) श्री. दीपक राजाराम शिर्के - जामीनदार पत्ता :मु.** पो. काटलवाडी, ता. चिपळूण,जि.रत्नागिरी, पिन -४१६ ६२८.**४) श्री. शांताराम महादेव कोलगे - जामीनदार पत्ता** :मु.पो.ब्राम्हणवाडी, शिरगाव, ता. चिपळूण,जि. रत्नागिरी, पिन - ४१५ ६०४. **कर्ज खाते क्रमांक : ६७१२६००४७४४**	समतुल्य गहाणखत ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथील मौजे शृंगारतळी येथील सर्व्हे क्र. २२ अ/१, उपविभाग क्र. १०, क्षेत्रफळ ०-२७-० (हे.आर.) या मिळकतीवरील नीलकंठ पार्क नामक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील, ग्रामपंचायत घर क्र. १७३२/बी-२ असलेला, ६७५ चौ. फूट क्षेत्रफळाचा निवासी फ्लॅट क्र. १०२. सदर मिळकतीच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत : पूर्व: सदनिका क्र.१०१,पश्चिम:-स.नं.२२ अ/१/१० ची मोकळी जागा., दक्षिण:- सदनिका क्र. १०३, उत्तर: स. नं. २० ची मोकळी जागा.	एकूण थकबाकी. रु. ५,३५,१५८/- + दि. ३०/११/२०२४ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ३०/११/२०२४ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. १६,६५,०००/-** **रु. १,६६,५००/-** **रु. १०,०००/-**	११.०७.२०२५
८	**१)श्री.अब्बास याकुब खान- कर्जदार २) सौ. रुखसाना अब्बास खान - सहकर्जदार** पत्ता : घर क्र.११५५/बी-५, फ्लॅट क्र. ५, पहिला मजला, सिद्धी अपार्टमेंट, मु. पो. कालमठ,ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६ ६०२. **२)श्री. दीपक राजाराम घांटे - जामीनदार** पत्ता :मु.पो.कालमठ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६ ६०२. **३)श्री. लतीफ समशेर खान जामीनदार मु. पो. कालमठ,** ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, पिन - ४१६ ६०२. **कर्ज खाते क्रमांक : ६७२०९००६७३६**	नोदंणीकृत गहाणखत मौजे कालमठ, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्र. ३अ/१अ, हिस्सा क्र. १, तसेच सर्व्हे क्र. ३अ/१, हिस्सा क्र. २७ व सर्व्हे क्र. ३अ/१, हिस्सा क्र. २८ या जमिनीवरील सिद्धी अपार्टमेंट नामक इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील, ग्रामपंचायत घर क्र. ११५५/बी-५ असलेला, बांधकाम क्षेत्रफळ ५१५ चौ. फूट असलेला निवासी फ्लॅट क्र. ५.सदर मिळकतीच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत : उत्तरेस : सदर फ्लॅटची भिंत, दक्षिणेस : निवासी फ्लॅट क्र. १ पूर्वेस : मोकळा पॅसेज, पश्चिमेस : निवासी फ्लॅट क्र. ४	एकूण थकबाकी. रु. ४,६५,८१९/- + दि.३०/१०/२०२३ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ३०/१०/२०२३ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च	**रु. १०,३९,०००/-** **रु. १,०३,९००/-** **रु. १०,०००/-**	२१.११.२०२४
९	**१)श्री.राजू गुलाब संभापुरे- कर्जदार** राहण्याचा पत्ता : फ्लॅट क्र. ९, दुसरा मजला, राह अपार्टमेंट, आझाद कॉलनी, मौजे झाडगाव, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी, पिन - ४१५ ६१२. **कायमचा पत्ता : श्री. गुलाब सय्यद संभापुरे यांचे सुपुत्र,२३१३,** सी वॉर्ड, अकबर मोहल्ला, दसरा चौक जवळ, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन - ४१६ ००३. **२) श्री. निलेश विनय पावसकर - जामीनदार** पत्ता :घर क्र.५६९, थिबा पॅलेस रोड,ता.रत्नागिरी, जि. रत्नागिरी, पिन - ४१५ ६१२